**जिल्हा परिषद परभणी अंतर्गत हरित**
**ग्राम सामाजीक दायित्व अभियान**
**राबविण्याबाबत मार्गदर्शक सुचना**

**जिल्हा परिषद परभणी**
**मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,**
**परिपत्रक क्रमांक/पंचायत/१८५**
**दिनांक :-११ जुन, २०२०**

**प्रस्तावना :-**

जागतिक उष्णतामानात सातत्याने होणारी वाढ, हवामान आणि ॠतू बदल , दुष्काळ , पाण्याचे दुर्भिक्ष, अतिवृष्टी , पूर इत्यादी नैसर्गिक आपत्तींवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी वृक्ष लागवड करणे आवश्यक आहे. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमाचे लोक चळवळीत रुपांतर होण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक , व्यक्ती , कुटुंब यांचा सहभाग अतिशय महत्वपुर्ण आहे.

महाराष्ट्र राज्यात वनक्षेत्र ३३% करण्यासाठी ५० कोटी वृक्ष लागवड कार्यक्रम शासनार्माफत सुरु असुन सन २०२० मध्ये १० कोटी वृक्ष लागवडीचे नियोजन आहे. निश्चितच अशा कार्यक्रमासाठी लोकसहभाग व लोकप्रबोधन होणे ही अपरिहार्य बाब आहे.

रामपुरी (बु.) ता.मानवत जि.परभणी या गावातील युवकांनी / नागरिकांनी एकत्र येऊन लोकसहभागातुन सामाजिक दायित्व व वृक्ष पालकत्व यांची उत्तम सांगड घालुन मोठया प्रमाणात वृक्ष लागवड व संगोपन करुन गाव हे हरित ग्राम बनवले आहे.

संपुर्ण परभणी जिल्हा सुंदर व हरित करण्यासाठी समाजातील सर्व वयोगटातील लोकांना प्रेरित करण्याच्या हेतुने व जिल्हयातील लोकप्रतिनिधी, नागरिक, युवक, अधिकारी / कर्मचारी यांचा सक्रीय सहभाग वाढविण्यासाठी या धर्तीवरच वृक्ष लागवडीची सामाजिक दायित्व व वृक्ष पालकत्व याची सांगड घालुन "**हरित ग्राम सामाजिक दायित्व अभियान**" राबविण्याची बाब जिल्हा परिषद परभणीच्या विचाराधिन होती.

**परिपत्रक :-**

संपुर्ण परभणी जिल्हा सुंदर व हरित करण्यासाठी जिल्हयातील लोकप्रतिनिधी, नागरिक, युवक, अधिकारी / कर्मचारी यांचा सक्रीय सहभाग वाढविण्यासाठी ,ग्रामस्थांमध्ये स्वयमं प्रेरणा, सर्वांमध्ये दायीत्वाची भावना निर्माण करुन, लोकसहभागातुन मोठया प्रमाणात वृक्ष लागवड व संगोपन व्हावे या उद्देशाने परभणी जिल्हा परिषद ने **हरित ग्राम सामाजीक दायित्व अभियान २०२०** उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे.

**अभियानाचे नाव** - **"हरित ग्राम सामाजीक दायीत्व अभियान"**
**कालावधी** - **१ जुलै ते ३१ जुलै २०२०**
**घोषवाक्य** - **" हरित गाव, माझ दायीत्व "**

**उद्दिष्टे :-**

१. वृक्ष लागवड व वृक्ष संगोपनाचे महत्व  रुजविणे व जागृती करणे.
२. लोकप्रतिनिधी, नागरिक, युवक, अधिकारी / कर्मचारी यांचा सक्रीय सहभाग वाढवणे.
३. पर्यावरणाविषयी अभ्यासवृत्ती व संदेश वाहक ग्रामस्तरावर निर्माण करणे.
४. वृक्ष लावगड व वृक्ष संगोपन कार्यक्रमाची व्याप्ती वाढवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.
५. वृक्ष दाता व वृक्ष पालक यांची सांगड घालुन मानवी स्वारस्याची साखळी निर्माण करणे.

**सामाजीक दायीत्व कोणी घ्यावे ?**

जिल्हा परिषदचे जिल्ह्यातील सर्व जि.प. सदस्य प.स. सदस्य, ग्रा.प. सदस्य, ग्रा.प.च्या सर्व उपसमित्यांचे सदस्य, जिल्हा परिषद अंतर्गत सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी स्वयंम प्रेरणेने खालील नियोजनाप्रमाणे वृक्ष लागवड व संगोपणाचे दायीत्व घ्यावे.

**सामाजीक दायीत्व स्विकारुन दयावयाच्या बाबीः  -**

**१. वृक्ष पालकाची निवड -**

सामाजिक दायित्व स्विकारुन ज्या गावामध्ये वृक्ष लागवड करणार आहात त्या गावातील व्यक्तींची निवड करावी.

**२. वृक्षरोप -**

दायीत्व स्विकारुन स्वतःस्थानिक परिस्थीती  व उपयुक्ततेनुसार झाडांची निवड करुन वृक्ष पालकाला उपलब्ध करुन लागवड करावी. उदा.

| अ.क्र. | बाब | वृक्षांच्या जाती |
|---|---|---|
| १. | अंगणवाडी | चिकु, संत्रा, मोसंबी, शेवगा ईत्यादी |
| २. | रत्यांच्या कडेला | कडुलींब, करंज, अमलतास, , वड, पिंपळ ईत्यादी |
| ३. | शेताच्या बांधावर झाडे | बांबु, हतगा, शेवगा, शेवरी,तुती ईत्यादी |
| ४. | देवालय, मंदीर ई परिसर | वड, उंबर, बेल,आपटा, चाफा ईत्यादी |
| ५. | शोभेची झाडे | गुलमोहर, अशोक, सरु, बदाम इत्यादी |

**३. ट्रि गार्ड (किमान ५ फुट उंची,  २ फुट व्यास व  लोखंडी जाळी असावी.) दयावे.**

**४. खालील प्रमाणे नाम फलक ट्रि गार्ड वर लावावा.**



**लोकप्रतीनिधी यांच्या दायीत्वाचे नियोजन -**

| अ.क्र. | लोकप्रतीनिधी | वृक्ष लागवड संगोपन दायीत्व संख्या |
|---|---|---|
| १. | मा. अध्यक्ष/ उपाध्यक्ष /सभापती (जि.प.) | १५ |
| २. | जि.प.सदस्य | १० |
| ३. | सभापती (पं.स.) | १० |
| ४. | पं. स. सदस्य | ५ |
| ५. | सरपंच | ५ |
| ६. | ग्रा.प. सदस्य | १ |
| ७. | कलम ४९ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या उपसमिती सदस्य | १ |

**अधिकारी व कर्मचारी यांच्या दायीत्वाचे नियोजन -**

| अ.क्र. | अधिकारी /कर्मचारी | वृक्ष लागवड संगोपन दायीत्व संख्या |
|---|---|---|
| १. | मुख्य कार्यकारी अधिकारी | १५ |
| २. | विभाग प्रमुख ( जि.प.) | १० |
| ३. | गटविकास अधिकारी | १० |
| ४. | सहा. गटविकास अधिकारी | ५ |
| ५. | विस्तार अधिकारी(पंचायत, एमएसआरएलएम,सांखिकी, आरोग्य /कृषी) | ५ |
| ६. | ग्रामसेवक | ५ |
| ७. | ग्रामपंचायत कर्मचारी | १ |

**शाळेमध्ये वृक्ष लागवड संगोपन -**

शालेय स्तरावरील जिल्ह्यातील वृक्ष लागवड संगोपन करण्यासाठी खालील प्रमाणे दायीत्वाची जबाबदारी पार पाडावी.

| अ.क्र. | अधिकारी /कर्मचारी | वृक्ष लागवड संगोपन दायीत्व संख्या |
|---|---|---|
| १. | गटशिक्षणाधिकारी | ५ |
| २. | विस्तार अधिकारी शिक्षण | ५ |
| ३. | केंद्र प्रमुख | ५ |
| ४. | मुख्याध्यापक | ३ |
| ५. | शिक्षक वृंद | २ |

**अंगणवाडी वृक्ष लागवड संगोपन -**

| अ.क्र. | अधिकारी /कर्मचारी | वृक्ष लागवड संगोपन दायीत्व संख्या |
|---|---|---|
| १. | बालविकास प्रकल्प अधिकारी | १० |
| २. | पर्यवेक्षक | ५ |
| ३. | सेविका व मदतनिस | २ |

**प्राथमिक आरोग्य केंद्र –**

तालुका वैद्यकिय अधिकारी यांनी आपल्या क्षेत्रातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रातील कार्यरत कर्मचारी यांच्या दायीत्व जबाब्दारी देवुन वृक्ष लागवड व संगोपन परिसर हरित करावा.

| अ.क्र. | अधिकारी /कर्मचारी | वृक्ष लागवड संगोपन दायीत्व संख्या |
|---|---|---|
| १. | तालुका वैद्यकिय अधिकारी | १० |
| २. | वैद्यकिय अधिकारी | १० |
| ३. | पर्यवेक्षक/वि.अ.(आ.) | ५ |
| ४. | ANM / परिचारीका | २ |

**उपरोक्त व्यतिरीक्त इतर शासकीय अधिकारी व कर्मचारी / कंत्राटी कर्मचारी -**

| अ.क्र. | अधिकारी /कर्मचारी | वृक्ष लागवड संगोपन दायीत्व संख्या |
|---|---|---|
| १. | जिल्हापरिषद स्तर | ३ |
| २. | पंचायत समितीस्तर | २ |
| ३. | ग्रामपंचायतस्तर | १ |

वरील प्रमाणे किमान दायीत्व घेतील. यापेक्षा जास्त दायीत्व स्वंयम प्रेरणेने घेता येईल.

**अशासकीय स्वयंसेवी संस्था (NGO) -**

जिल्ह्यात कार्यरत असणा-या विविध अशासकीय स्वयंसेवी संस्था यांनी सुध्दा वृक्ष लागवडीचे दायित्व घ्यावे. (उदा. इंडियन मेडीकल असोशिएशन परभणी, ॲस्ट्रोनॉमीकल सोसायटी, हरित परभणी व इतर)

**वृक्ष पालकत्व कोणी घ्यावे ?**

जिल्हयातील सर्व ग्रामपंचायत मधील नागरिक (विशेषतः युवक-युवती , विद्यार्थी-विद्यार्थीनी, बचत गटातील महिला) अंगणवाडी सेवीका, अंगणवाडी मदतनीस, ANM/परिचारीका, ग्रामपंचायत कर्मचारी, जलसुरक्षक, रोजगार सेवक,स्वच्छागृही ई. यांनी वृक्ष संगोपनाचे पालकत्व स्विकारुन वृक्ष जोपासावे.

**वृक्ष पालकाची भुमिका -**

१. सामाजिक दातृत्व स्विकारुन उपलब्ध करुन दिलेले वृक्षरोप व ट्रिगार्ड याचा वापर करुन वृक्ष लागवड व संगोपन करावे.
२. वृक्षाची निगा राखणे व आवश्यकतेनुसार पाणी देणे

**अभियानाची प्रचार प्रसिध्दी -**

उपरोक्त प्रमाणे वृक्ष दाता व वृक्ष पालक यांची सांगड घालुन मानवी स्वारस्याची साखळी निर्माण करुन वृक्ष लागवड करण्यात यावी व या बाबतचा सेल्फी फोटो **#हरित गाव-माझ दायीत्व** असा वापर करुन सामाजिक माध्यमावर पोस्ट करावेत.

ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसेवक सदर अभियानाची अंमलबजावणी करतील . तालुकास्तरावर गटविकास अधिकारी नोडल अधिकारी असतील.

वृक्ष लागवड व संगोपनाचे दायीत्व स्विकारल्याची माहिती तालुक्यास्तरावर एकत्रित करुन अहवाल जिल्हास्तरावर परिशिष्ठ - १ मध्ये पाठविण्यात यावा. जिल्हा स्तरावर माहिती पाठविण्याची जबाबदारी विस्तार अधिकारी (पंचायत) यांना देण्यात येत आहे. परिपत्रकातील सुचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक जिल्हा परिषद, परभणीच्या http://zpparbhani.gov.in या संकेतस्थळावर तसेच **DREAMS ॲप** वर सुध्दा उपलब्ध करण्यात आले असुन, सदर परिपत्रक हे डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

PRITHVIRAJ BADRI PRASAD

Digitally signed by PRITHVIRAJ BADRI PRASAD
DN: c=IN, o=ZILLHA PARISHAD PARBHANI, ou=ZILLHA PARISHAD, postalCode=431401, st=MAHARASHTRA, cn=PRITHVIRAJ BADRI PRASAD
Date: 2020.06.11 18:22:28 +05'30'

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद परभणी**

**प्रतिलीपी माहितीस्तव :-**

१. मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
२. मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय समिती, परभणी

**प्रतिलीपी माहिती व कार्यवाहीस्तव :-**

१. मा. अध्यक्षा / उपाध्यक्ष / सभापती / सदस्य, जिल्हा परिषद, परभणी.
२. मा.सभापती / उपसभापती / सदस्य, पंचायत समिती,(सर्व) -----------------
३. विभाग प्रमुख-----------------------(सर्व), जिल्हा परिषद, परभणी यांना देऊन सुचित करण्यात येते कि, आपले अधिनिस्त असणा-या सर्व अधिकारी / कर्मचारी यांना परिपत्रकातील सुचनानुसार कार्यवाही करणेबाबत आदेशित करावे.
४. गट विकास अधिकारी, पंचायत समिती ---------------(सर्व.) आपले अधिनिस्त असणा-या सर्व अधिकारी / कर्मचारी यांना परिपत्रकातील सुचनानुसार कार्यवाही करणेबाबत आदेशित करावे
५. सरपंच / सचिव / सदस्य ग्रा.पं.------------------,पं.स.------------------ आपले स्तरावरील संबंधीतांना परिपत्रकातील सुचनानुसार कार्यवाही करणेबाबत सुचित करावे.

## परिशिष्ट - १

**ग्रामपंचायतीचे नावः-** **पंचायत समितीचे नाव -**

| अ.क्र. | अधिकारी/पदाधिकारी यांचे नाव व पद | वृक्ष पालकांचे नाव | | वृक्ष लागवड परिसर (उदा. ग्रा.प. चे नाव, अंगणवाडीचे नाव,) |
|---|---|---|---|---|
| | | १ | | |
| | | २ | | |
| | | ३ | | |
| | | ४ | | |
| | | ५ | | |
| | | ... | | |

स्वाक्षरी
ग्रामसेवक
पंचायत समिती---------